# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे सन 2013–14 या सत्रात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे.

1) 22/8/2013 – सौ. अपर्णा रामतीर्थकर यांचे व्याख्यान, विद्यार्थ्यानी 'थोडे भान ठेवावे' या विषयावर रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

2) 30/08/2013 – सामान्य रूग्णालय, वर्धा यांचे सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी शरीर स्वास्थासंबंधी मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन.

3) 8/9/2013 – सद्भावना रॅलीचे आयोजन.

4) 11/9/2013 विवेकानंद विश्वबंधू दीन – यात प्राचार्य तायडे, प्रा. पाटणे, प्रा. बेताल, प्रा. सुरकार यांच्यासह 928 विद्यार्थ्याचा सहभाग.

5) 23/9/2013 – महात्मा गांधी यांना सेवाग्राम येथे यायला 80 वर्षे पुर्ण झाल्याबद्दल वर्धा रेल्वे स्टेंशन ते एमगिरी पर्यंत झालेल्या रॅलीत 100 विद्यार्थ्यांचा सहभाग अणि सोबतच रेल्वेचे ड्रायव्हर व गार्ड यांचे स्वागत.

6) 24/9/2013 – स्थापना दिवस – प्रमुख अतिथी मा. मटकर साहेब, अध्यक्ष सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान मा. गडकरी साहेग, डॉ. कोटेवार, प्राचार्य येळणकर आणि प्राचार्य डॉ. सौ. तायडे यांच्यासह 150 विद्यार्थी सहभागी.

7) 2/10/2013 – महात्मा गांधी जयंतीनिमित्य महाविद्यालयाची साफसफाई 13/10/2013 ते 14/10/2013 – महाविद्यालयातील परीसर स्वच्छता.

8) 4/12/2013 – रक्तदान शिबीर एकुण 18 विद्यार्थ्याचा सहभाग, डॉ. स्वाती पाटील व जिल्हा सामान्य रूग्णालय यांची चमु, शिबिराचे अध्यक्ष डॉ. पुष्पा तायडे, प्रा. मोहन सोनुरकर, प्रा. शत्रुघ्न मानकर व डॉ. विलास भिमनवार.

9) 12/01/2014 – विवेकानंद जयंती कार्यक्रम – अध्यक्ष प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे प्रमुख अतिथी – प्रा. राजीव जाधव यांच्या उपस्थितीत.

10) 21/1/2014 जे 27/1/2014 राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचे विश्वशांती साधना प्रतिष्ठान, दत्तपुर येथे आयोजन.

21/1/2014 – शिबीर स्थळी विद्यार्थ्याचे आगमन

22/1/2014 – सकाळी 5 वा. जागरण, प्रार्थना, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास सकाळी 10.00 वा. उद्घाटन समारोह, कार्यक्रमाचे अध्यक्ष – डॉ. गजानन कोटेवार, सचिव लोक शिक्षण प्रसारक मंडळ वर्धा. प्रमुख अतिथी – प्राचार्या डॉ. पुष्पा तायडे यांच्या उपस्थितीत पार पडले. दुपारी 2 ते 3 विद्यार्थ्याची गटचर्चा – आजची तरूण पिढी बिघडली काय? दुपारी 3 ते 4 सत्र डॉ. रविशंकर शर्मा यांचे कुष्ठरोग निमुलन यावर मार्गदर्शन. दुपारी 5 ते 7 विविध खेळ व प्रार्थना रात्री मनोरंजनात्मक कार्यक्रम.

23/1/2014 – सकाळी 5 वा. जागरण, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास, सकाळी 8 ते 11 स्वच्छता अभियान, दुपारी 2 ते 3 विद्यार्थ्याची गटचर्चा विषय – मोबाईलचा उपयोग.

दुपारी 3 ते 4 बौध्दिक सत्र – प्रा. सुरेश बणराज यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन. दुपारी 5 ते 7 विविध खेळ व प्रार्थना रात्री मनोरंजनात्मक कार्यक्रम.

24/1/2014 सकाळी 5 वा. जागरण, प्रार्थना, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास, सकाळी 8 ते 11 स्वच्छता अभियान; दुपारी 2 ते 3 विद्यार्थ्याची गटचर्चा विषय विनामुल्या सेवा हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद आहे. दुपारी 3 ते 4 बौध्दिक सत्र – आचार्य सहजानंदजी यांचे विद्यार्थ्यांना राष्ट्रकार्यात सहभाग विषयावर मार्गदर्शन. दुपारी 5 ते 7 विविध खेळ व प्रार्थना, रात्री मनोरंजनात्मक कार्यक्रम.

25/1/2014 – सकाळी 5 वा. जागरण, प्रार्थना, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास, सकाळी 8 ते 11 स्वच्छता अभियान व नांगरणी, दुपारी 2 ते 3 विद्यार्थ्यांची गटचर्चा विषय – अंधश्रध्दा निर्मुलन. दुपारी 3 ते 4 बौध्दिक सत्र – प्रा. श्याम देशपांडे यांचे स्वामी विवेकानंदावर व्याख्यान. दुपारी 5 ते 7 विविध खेळ व प्रार्थना रात्री मनोरंजनात्मक कार्यक्रम.

26/1/2014 – सकाळी 5 वा. जागरण, प्रार्थना, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास, सकाळी 8 ते 11 शेतात बीजारोपण करणे, भेंडी, चवळी यांची लागवड. दुपारी 2 ते 3 विद्यार्थ्याची गटचर्चा विषय – महिलांची सुरक्षा. दुपारी 3 ते 4 बौध्दिक सत्र – साध्वी निजानंदीजी यांचे राष्ट्रभक्तीपर भजन (वाद्यासहीत). सायंकाळी 7.00 वा. विविध प्रार्थना. रात्री 8.00 ते 10.00 वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम.

27/1/2014 – सकाळी 5 वा. जागरण, प्रार्थना, सूर्यनमस्कार, आसने यांचा अभ्यास, सकाळी 8 ते 9 प्रभातफेरीचे आयोजन, सकाळी 10 ते 12 समारोप समारंभ – अध्यक्ष, डॉ. गजानन कोटेवार, प्रमुख अतिथी : प्राचार्य अमृतराव येऊलकर, डॉ. रविशकंर शर्मा, साध्वी निजानंदीजी सहजानदजी, प्राचार्या डॉ. पुष्पा तायडे, प्रा. सौ. कविता सानप, प्रा. सुनिल पाटणे कार्यक्रमास उपस्थितीत.

शिबीराची उद्दिष्टे :–

1 गावातील कुष्टरोगी बांधवाचे सहकार्य.

2 सकाळी व यायंकाळी 7 वाजता प्रार्थनाकरीता व ग्रामगीता यावर मार्गदर्शन.

3 डॉ. रविशंकर शर्मा यांचे उपस्थितीत विद्यार्थ्यांना शेती, नांगरणी, वखरणी यांचे प्रशिक्षण.

Principal,
Lok Mahavidyalaya
WARDHA.